ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील शैक्षणिक परिवर्तन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: एक सर्वसमावेशक धोरण

*डॉ. किरण सावे ,

* प्राचार्य, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

**सारांश :**

केंद्र शासनाने इस्त्रोचे माजी संचालक डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील नामवंत शिक्षणतज्ञाचा समावेश असलेल्या समितीने तयार केलेले सर्वसमावेशक असलेले आणि देशाच्या उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरू शकेल असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. कोणत्याही देशामध्ये त्या देशाची शिक्षणव्यवस्था ही त्या देशाच्या विकासाची पूर्वअट मानली जाते. खऱ्या अर्थाने शैक्षणिक तत्वज्ञानाची मुलतत्वे विचारात घेवून तयार करण्यात आलेले हे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत – जो घटक खऱ्या अर्थाने वर्षानुवर्षांच्या व्यवस्थेमुळे वंचित राहिला आहे, त्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा विचार या धोरणात केला गेला आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अनेक अत्यंत महत्वपूर्ण व मुलभूत स्वरुपाच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण, प्रायोगिक, व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना, संशोधनाला महत्व, अभ्यासक्रमांची लवचिक रचना, शिक्षकांचे एकात्मिक प्रशिक्षण, शैक्षणिक स्वायत्तता, शिक्षणासाठीची वाढीव आर्थिक तरतूद, विविध संस्थांमधील शैक्षणिक सामंजस्याला प्रोत्साहन, नवीन शैक्षणिक आकृतीबंध इ. अनेक महत्वपूर्ण तरतूदींचा उल्लेख करावा लागेल.

यासंदर्भात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करावी किंवा कशी केली पाहिजे हा आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये आपल्या शैक्षणिक आकृतीबंधा मधील आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेमधील अनेक दोषांचा आणि समस्यांचा आढावा घेऊन ते दोष आणि समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून भविष्यातील समाज घडविण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण तरतूदी या शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आल्या आहेत. परंतु या तरतूदींची अंमलबजावणी जर विहित कालमर्यादेमध्ये प्रभावीपणे झाली नाही तर मात्र आपली सध्याची परंपरागत व्यवस्था तिच्यातील दोषांसह तशीच चालू राहील असे म्हणावेसे वाटते.

**महत्वाचे शब्द:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, दूरदृष्टी, मानवी विकास निर्देशांक, शैक्षणिक आकृतीबंध, शाळा समूह, शैक्षणिक स्वायत्तता

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

केंद्र शासनाने इस्त्रोचे माजी संचालक डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील नामवंत शिक्षणतज्ञाचा समावेश असलेल्या समितीने तयार केलेले सर्वसमावेशक असलेले आणि देशाच्या उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरू शकेल असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. या शैक्षणिक धोरणाच्या दूरदृष्टीमध्ये (Vision) असे नमूद केले आहे की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते ज्यामध्ये सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय्य व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तित करण्यात थेट योगदान देते.

कोणत्याही देशामध्ये त्या देशाची शिक्षणव्यवस्था ही त्या देशाच्या विकासाची पूर्वअट मानली जाते. देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी शिक्षण आणि कुशल मनुष्यबळ हे दोन अत्यंत महत्वपूर्ण घटक आहेत. कुशल मनुष्यबळाची निर्मिती ही शिक्षणामधून व्हावी अशी अपेक्षा असते. त्या दृष्टीकोनातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अनेक तरतुदी अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. शिक्षण हा मानवी विकासाचा प्रमुख निर्देशांक असल्याने त्याकडे कायमच सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जाते. किंबहुना शिक्षण हे व्यक्तीच्या शारिरीक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाच्या संदर्भात परिणाम करणारा जीवनातील सर्वाधिक गतीशील प्रवाह आहे. म्हणूनच या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करण्यात येऊन त्या अनुषंगाने पूर्वप्राथमिक अभ्यासक्रमापासून ते उच्च शिक्षणापर्यंत हे बदल कसे अमलात येतील याचा साकल्याने विचार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रचलित संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जर शासनाने या नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे आणि योग्य पध्दतीने केली तर आमूलाग्र स्वरूपाचे शैक्षणिक बदल येत्या काही वर्षांमध्ये साकारले जातील यात शंका नाही. शैक्षणिक आकृतीबंध संपूर्ण देशाची किंवा समाजाची प्रगती निर्धारित करीत असतो. या दृष्टीकोनातून पाहिले तर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपली प्रचलित शिक्षण व्यवस्था काही प्रमाणात दोषपूर्ण आहे. या व्यवस्थेच्या निश्चितपणे काही मर्यादा आहेत हे आपणास मान्य करावे लागेल. बदलत्या काळानुसार या व्यवस्थेमध्ये बदल होणे आवश्यक होते. ते बदल का झाले नाहीत याची या संदर्भात चर्चा करणे हा या लेखाचा हेतू नाही. परंतु आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये प्रदीर्घ काळापासून मूलगामी स्वरूपाचे बदल झालेले नाहीत ही वस्तूस्थिती आहे. आपली शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक बनविण्याच्या दृष्टीने काही आवश्यक बदल त्यामध्ये करणे अत्यंत गरजेचे होते. ते बदल करण्याच्या दृष्टीने आणि शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक बनविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण तयार करून त्यास मंजूरी दिली आहे. सदर शैक्षणिक धोरण २०२३–२०२४ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येण्याची दाट शक्यता आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच सर्वसमावेशक असलेले आणि जगाच्या स्पर्धेत निर्विवादपणे टिकू शकेल आहे असे शैक्षणिक धोरण जाहीर झाले. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयातर्फे २०१९ मध्येच 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९' चा मसुदा जाहीर करण्यात आला. सर्वसामान्य नागरिक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या बरोबरच उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ यांना अभ्यासण्यासाठी आणि सूचनांसाठी हा मसुदा खुला करून देशभर त्याच्यावर चर्चा घडवून आणली गेली. त्यानंतर सर्व सूचनांचा

सर्वांगीण विचार करून उपयुक्त सूचनांचा समावेश करून २९ जुलै २०२० रोजी केंद्र सरकारतर्फे अंतिम मसुदा संमत करण्यात येवून सर्वसमावेशक असे राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर झाले. खऱ्या अर्थाने शैक्षणिक तत्वज्ञानाची मुलतत्वे विचारात घेवून तयार करण्यात आलेले हे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेली ७५ वर्षे मेकॉलेच्या सिद्धांतावर भारतीय शिक्षणपद्धतीचा डोलारा उभा आहे. त्यामुळे नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशा जागतिक शिक्षण संस्थांचा, विद्यापीठांचा वारसा विस्मृतीमध्ये गेला आहे. परिणामी प्राचीन उच्च दर्जाच्या शिक्षणपद्धतीमधूनच चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, पाणिनी, गार्गी, मैत्रेयी, भास्कराचार्य असे विद्वान निर्माण झाले, हा इतिहास विस्मरणात गेला. चाणक्याचे अर्थशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, युद्धशास्त्र, नीतिशास्त्र याचा शिक्षणपद्धतीत कधी विचारच झाला नाही. राष्ट्रहित, जीवनमूल्ये, सर्जनशीलता, विचारप्रवर्तन, वैचारिक समृद्धी, विद्याभ्यासाचे स्वातंत्र्य, कृतिशीलता अशा प्रकारचा विद्यार्थीकेंद्रित विचार आतापर्यंत फारसा कुठे दिसून आलाच नाही. केवळ पुस्तकी ज्ञानावर आणि वर्षाच्या शेवटी लेखी परीक्षेवर आधारित संकुचित शिक्षण पद्धतीच्या पारंपारिक वाटेवर अनेक पिढ्या सर्वसमावेशक आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवू शकेल अशा शिक्षणापासून वंचित राहिल्या. विद्यार्थ्यांच्या क्षमतेच्या आणि बौद्धिक संपदेच्या बळावर मनुष्यनिर्मिती (Man Making) हे तत्त्व विचारात घेतले गेले नाही. त्यामुळे आज आपल्याला प्राचीन समृद्ध वारसा असूनही जागतिक स्तरावर आपण संशोधन, स्वामित्व हक्क (Patents), विज्ञान, तंत्रज्ञान या विषयांत काहीसे मागे राहिले आहोत.

केंद्र सरकारने जाहीर केलेले नवीन शिक्षण धोरण हे राष्ट्राची शिक्षणनीती कशी असावी, याची सुस्पष्ट कल्पना देणारे आहे. शिक्षणपद्धतीतून असे नागरिक निर्माण व्हावेत, ज्यांचा दैनंदिन आचार–विचार–व्यवहाराचा पायाच राष्ट्रीयत्वावर आधारित असेल. या राष्ट्राची संस्कृती, भाषा, इतिहास, परंपरा, समाजमन यातून विद्यार्थ्यांना आपल्या देशाची ओळख व्हावी, याची दक्षता राष्ट्रीय शिक्षण धोरणात घेण्यात आली आहे. केंद्र सरकारने आणि शिक्षण मंत्रालयाने डॉ. कस्तुरीरंगन यांच्या समितीला धोरण ठरवण्याचे स्वातंत्र्य आणि सर्वाधिकार दिल्याने नवीन शैक्षणिक धोरण हे संपूर्ण राष्ट्रकेंद्रित आणि जनतेचे प्रतिबिंब असलेले धोरण असल्याचे दिसून येते.

या शैक्षणिक धोरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत – जो घटक खऱ्या अर्थाने वर्षानुवर्षांच्या व्यवस्थेमुळे वंचित राहिला आहे, त्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा विचार या धोरणात केला गेला आहे. त्यासाठी विद्यार्थी गळती (School Dropouts) शून्य टक्क्यावर आणण्याची शिफारस आणि त्यासाठी उपाययोजना व आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे लाखो विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येतच नाहीत. शिक्षणप्रवाहात आले, तर टिकत नाहीत. ही केवळ सामाजिक आणि शैक्षणिक समस्या नसून खरे तर एक प्रकारे ती राष्ट्रीय समस्या आहे. या शाळाबाह्य विद्यार्थ्यांमधून बेरोजगारी, गरिबी, गुन्हेगारी, व्यसनाधीनता अशा बिकट समस्या निर्माण होतात. या समस्यांचे उच्चाटन व्हावे, यासाठी विद्यार्थी गळतीचे प्रमाण शून्य टक्क्यांवर आणण्याचा संकल्प या शिक्षण धोरणात आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अनेक अत्यंत महत्वपूर्ण व मुलभूत स्वरुपाच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण, प्रायोगिक, व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना, संशोधनाला महत्व,

अभ्यासक्रमांची लवचिक रचना, शिक्षकांचे एकात्मिक प्रशिक्षण, शैक्षणिक स्वायत्तता, शिक्षणासाठीची वाढीव आर्थिक तरतूद, विविध संस्थांमधील शैक्षणिक सामंजस्याला प्रोत्साहन, नवीन शैक्षणिक आकृतीबंध इ. अनेक महत्वपूर्ण तरतूदींचा उल्लेख करावा लागेल.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील काही महत्वपूर्ण तरतूदी व या धोरणाची मूलभूत वैशिष्टे लक्षात घेतली तर हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संपूर्ण देशातील एकूणच शिक्षण व्यवस्था बदलण्यासाठी किती महत्त्वपूर्ण ठरणार आहे हे आपल्या लक्षात येईल.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांबरोबरच बाल शिक्षणाचाही विचार आणि आग्रह दिसून येतो. त्यासाठी 'बाल्यावस्थापूर्व संगोपन आणि शिक्षण' (ECCE – Early Childhood Care and Educational) ही संकल्पना शिक्षण धोरणात समाविष्ट केली आहे. मूल जन्मल्यापासून वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत (वय वर्षे शून्य ते सहा) मुलांच्या मेंदूचा सर्वांगीण विकास होत असतो. ECCE म्हणजे बाल्यावस्थापूर्व संगोपनाचे आणि शिक्षणाचे दायित्व शिक्षण मंत्रालयाकडे सोपवलेले असून, नियोजन व अंमलबजावणीसाठी विशेष संयुक्त कृती दल गठित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर एनसीईआरटीला वय वर्षे आठपर्यंतच्या मुलांसाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यास सांगण्यात आले आहे.

शिक्षणाचा आकृतीबंध नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदलत आहे. या नवीन धोरणानुसार, पूर्व प्राथमिक शिक्षणाचा समावेश आता औपचारिक अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. १०+२ हा प्रचलित आकृतीबंध बदलून आता ५+३+३+४ (पहिली पाच वर्षे म्हणजे पूर्व प्राथमिकची तीन अधिक पहिली आणि दुसरी अशी असणार आहेत) हा नवीन आकृतीबंध लागू होणार आहे. म्हणजेच शिक्षणाच्या अधिकारांची व्याप्ती आता ६ ते १४ ऐवजी ३ ते १४ या वयोगटामध्ये विस्तारीत होणार आहे. या नवीन आकृतीबंधामध्ये बोर्डाच्या परीक्षेचे महत्त्व कमी होईल. बालकांच्या जडणघडणीचा हा अत्यंत संवेदनशील कालावधी असतो हे लक्षात घेऊन प्राथमिक स्तरावर भाषा, विज्ञान, वाचन, लेखन, गणित तसेच विविध प्रकारची पायाभूत कौशल्ये यांचा विकास अत्यंत प्रभावीपणे कसा होईल याचा विचार या शैक्षणिक आकृतीबंधामध्ये केलेला आहे.

आकृतीबंधातील पहिल्या पाच वर्षांपैकी सुरुवातीच्या तीन वर्षांचा विचार बालमानसशास्त्रामधील सिद्धांतानुसार केला आहे. या प्रारंभीच्या काळात बालकाच्या हातात पाटी, पेन्सिल, पुस्तक, संगणक किंवा टॅब या शैक्षणिक साधनांचे ओझे न ठेवता केवळ निरीक्षण, श्रवण, कथन अशा अंगभूत गुणांना वाव देऊन आनंददायक शिक्षणातून बालकाच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट सुरुवातीच्या तीन वर्षांत असणार आहे. त्यासाठी विशिष्ट प्रकारचा अभ्यासक्रम आणि अध्यापनपद्धती विकसित करून अंगणवाडी, बालवाडी शिक्षकांच्या प्रशिक्षणाचाही विचार त्यात केला आहे. त्याचप्रमाणे पुढील शालेय शिक्षणाचाही ३+३ अशा दोन टप्प्यांत विचार केला आहे, ज्यामध्ये वाचन, लेखन, अक्षरओळख, शब्दांची ओळख, शब्दसंग्रह, भाषा आणि भाषेतर विषयांची ओळख, गणित, इंग्लिश विषयाचा अभ्यास हा प्राथमिक स्तरावर एकूण सहा वर्षांत पूर्ण केला जाणार आहे. त्यानंतर वय वर्षे १४ ते १८— म्हणजे पौगंडावस्थेतील मुलांचा महत्वपूर्ण टप्पा (+४) — ज्याला माध्यमिक म्हणता येईल, तो नव्या आकृतीबंधात आहे. इयत्ता नववी ते बारावीच्या शिक्षणात प्रथमच विषयांची लवचीकता आणि कौशल्य विकसित होणाऱ्या व्यावसायिक

अभ्यासक्रमातील विषयांचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. व्होकेशनल एज्युकेशन हे स्वतंत्र न राहता इयत्ता सहावीपासूनच शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश केल्याने, बारावी उत्तीर्ण होत असताना विद्यार्थ्याला किमान एका कौशल्याचे व्यवस्थित शिक्षण मिळालेले असेल, ज्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी बनू शकेल. इयत्ता अकरावी–बारावीमधील पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान शाखांची चौकट मोडून विद्यार्थ्यांना बहुशाखीय विषयांचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे गेल्या चार दशकांतील साचेबंद विचारांचा मर्यादित परीघ आता विस्तारित होणार असून विद्यार्थ्याला त्याच्या आवडीचे विषय घेऊन त्याला त्याच्या भविष्याचे नियोजन करणे शक्य होणार आहे. एक अत्यंत महत्त्वाचा बदल म्हणजे 'सहशालेय उपक्रम' हे आता अभ्यासक्रमाचा भाग होणार आहेत. सहशालेय उपक्रम हे विरंगुळ्याचे अथवा करमणुकीचे माध्यम न राहता नृत्य, नाटक, खेळ, चित्रकला, वक्तृत्व, वादन, संभाषण, रंगकाम, भरतकाम, नक्षीकाम असे उपक्रम हे अभ्यासक्रमाचा भाग मानून त्यालाही गुण देण्यात येणार आहेत. सहशालेय उपक्रम अभ्यासक्रमाचा भाग होणार असल्याने क्षमता वाढविणारे नवे विषय, नवा अभ्यासक्रमसुद्धा विकसित होऊन विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा पर्याय खुला होणार आहे. या नव्या आकृतीबंधातून घडत जाणारा विद्यार्थी अधिक सर्जनशील, अधिक चौकस, अधिक विचार करणारा आणि भविष्यात येणाऱ्या बदलांचा सामना करणारा असेल.

नववी ते बारावी हा आकृतीबंधामधील शेवटचा टप्पा असल्याने दहावीच्या आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांचे महत्त्वच राहणार नाही असा एक गैरसमज दिसून येतो. मात्र या धोरणात कुठेही बोर्डाच्या परीक्षेचे महत्त्व कमी झालेले नाही, किंबहुना बोर्डाच्या परीक्षांची पुनर्रचना होणार असून या परीक्षांचे महत्त्व कायम राखण्याची तरतूदही या शिक्षण धोरणात आहे. सध्याच्या इयत्ता दहावीच्या व बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांमुळे खाजगी कोचिंग क्लासेसचे किंवा इंटिग्रेटेड क्लासेसचे अवास्तव महत्त्व वाढले असून, काही कोचिंग क्लासेसनी तर शिक्षणाचे बाजारीकरण केले आहे. नव्या धोरणानुसार विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेतही लवचीकता असणार आहे. त्यासाठी या परीक्षांची पुनर्रचना प्रस्तावित आहे. बोर्डाच्या परीक्षांची फेररचना करताना विद्यार्थ्यांच्या गुणांचा, टक्केवारीचा विचार न करता अभ्यासलेल्या भागावरच विद्यार्थ्याला किती ज्ञान मिळालेले आहे ते आणि त्याच्या क्षमता काय आहे असा विचार केला जाणार आहे. त्याचप्रमाणे बोर्डाच्या परीक्षांची भीती वाटू नये, यासाठी परीक्षेचे स्वरूप सुटसुटीत व सोपे करण्याचा प्रस्ताव आहे.

शाळा समूहांची ( School Complex ची) स्थापना करणे हा एक खूप चांगला विचार राष्ट्रीय शिक्षण धोरणात करण्यात आला आहे. एकाच विभागात जवळ जवळ असणाऱ्या शाळांचा एक समूहगट तयार करून त्या समूहगटातील शाळांनी (शिक्षक, मुख्याध्यापक, व्यवस्थापन यांनी) समूहातील सर्व शाळांचा एकात्म विकास करावा, अशी शिफारस या धोरणात आहे.

सर्वसाधारणपणे आपणास असा अनुभव येतो की एकाच विभागातील जवळ जवळच्या शाळांमध्ये त्यांच्या पायाभूत सुविधा, उपलब्ध साधनसामग्री, शिक्षक यामुळे विषमता निर्माण होते, एक प्रकारची दरी उत्पन्न होते, त्यातून जीवघेणी स्पर्धा निर्माण होते, याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. परिस्थितीमुळे ज्या विद्यार्थ्याला चांगल्या शाळेत प्रवेश मिळू शकलेला नाही, तो त्याच्या लहान शाळेत दबून जातोय ज्या लहान शाळेत प्रशस्त वाचनालय, खेळाचे मैदान, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भव्य सभागृह

अशा सुविधा नाहीत, अशा शाळांमधील विद्यार्थी या सर्व सुविधांना मुकतोय स्वाभाविकपणे त्याच्या विकासात अडथळा निर्माण होतो. शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये ही एक प्रकारची वैचारिक अस्पृश्यता निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने एकूण समाजरचनेत अशी स्थिती खूप वाईट ठरते. हे न्यूनत्व दूरगामी नकारात्मक परिणाम करणारे ठरते. हा सगळा विचार करता शाळा समूह ही संकल्पना एकाच विभागातील जवळ असणाऱ्या शाळांमध्ये परस्पर सहकार्य आणि एकात्मभाव उत्पन्न करणारी आहे. यासाठी शासकीय जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या आधिपत्याखाली शाळा समूह व्यवस्थापन समितीची (SCDP ची) स्थापना करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे समूहातील शाळांचे वार्षिक नियोजन करणे, समूहातील सर्व शाळांची गुणवत्ता राखणे, उच्चतम दर्जाचे अध्ययन–अध्यापन करणे शक्य होणार आहे. शिक्षण क्षेत्रातील विषमता दूर होण्याच्या दृष्टीने शाळा समूह रचना परिणामकारण ठरणार आहे. एकट्याचा विचार न करता समूहाचा विचार करण्याची एक चांगली सवय विकसित होण्यास यामुळे हातभार लागेल. शाळा म्हणून स्वतंत्र अस्तित्व कायम राखून, अतिरिक्त साधनसामग्री, शिक्षक यांचा संयुक्तपणे वापर होऊ शकेल. या समूहशास्त्रातून समाजात एक प्रकारे सामाजिक भान उत्पन्न होईल.

या शिक्षणपद्धतीत अंगणवाडी ते इयत्ता आठवीपर्यंत (किमान इयत्ता पाचवीपर्यंत) मातृभाषेतूनच मुलांना प्राथमिक शिक्षण द्यावे, अशी शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे माध्यमिक आणि पुढील शिक्षणातसुद्धा विद्यार्थ्यांना भाषा विषय निवड स्वातंत्र्य दिलेले आहे. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण व्हावे असे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी आणि मानसशास्त्रज्ञांनीही सुचवलेले आहे. त्याला वैज्ञानिक आधारही आहे. त्यामुळे या शिक्षण धोरणातही डॉ. कस्तुरीरंगन समितीने अंगणवाडी ते इयत्ता आठवीपर्यंतच्या मुलांनी त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण घ्यावे, ज्यामुळे मूळ संकल्पना स्पष्ट होतात, हीच शिफारस केली आहे. मात्र या विषयात समाजाकडून मिळणारा प्रतिसाद फारच नकारात्मक आहे. मातृभाषेचे महत्त्व मान्य करूनही मुलांना इंग्लिश माध्यमातून शिकवण्याचा अतिरेक झाला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये किमान इयत्ता पाचवी पर्यंत किंवा शक्य असल्यास इयत्ता आठवी पर्यंत शिक्षण मातृभाषेतून असावे आणि गरजेनुसार द्विभाषा दृष्टीकोन अंमलात आणण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आवश्यक तरतूद आहे. आपण जर जगातील अनेक विकसित राष्ट्रांचा विचार केला तर असे लक्षात येईल की ज्या देशांच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये मातृभाषेला प्राधान्य दिले आहे त्या देशांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन इ. क्षेत्रांमध्ये विलक्षण वेगाने प्रगती झालेली आहे. जगभरातील शिक्षणतज्ञांचे या बाबतीत एकमत आहे की, मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण हे अत्यंत प्रभावी ठरत असते. मातृभाषेतून शिक्षण दिल्याने विज्ञान व भाषेबरोबरच विविध विषयामधील मूलभूत संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे विकसित होतात आणि त्या कायमस्वरूपी स्मरणातही राहतात. तसेच मातृभाषेतील शिक्षणामुळे विविध मुलभूत क्षमता, सुप्त गुण आणि प्रतिभाशक्ती कमाल मर्यादेपर्यंत विकसित होण्यास मदत होत असते. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण तरतूद या धोरणामध्ये करण्यात आली आहे असे म्हणता येईल.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, या शैक्षणिक धोरणामध्ये प्रायोगिक, व्यावसायिक, कौशल्याधारित आणि संशोधनाला चालना देणाऱ्या शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. म्हणजे अगदी शालेय शिक्षणापासून पाहिले तर सहावी ते आठवी दरम्यान सर्व

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य आणि कलाकुसर या विषयी संपूर्ण एक वर्षामध्ये सर्वेक्षण कोर्स करावा लागेल. याचा अर्थ असा की शालेय शिक्षणादरम्यान मुलांना व्यावसायिक क्षेत्राचा अनुभव मिळेल आणि पुढे नववी ते बारावी मधील मुलांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक विषयाची निवड करण्याची संधी मिळेल. आणि त्यामध्ये मुलांना दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम मिश्र पध्दतीने निवडण्याची मुभा असेल. ही तरतूद विद्यार्थ्यांचे पुढील करिअर निश्चित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याचबरोबर संशोधनाच्या बाबतीत उच्च शिक्षण संस्थांमध्ये जागतिक दर्जाचे संशोधन होण्यासाठी सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला आहे. तसेच शैक्षणिक संस्थांची संशोधनाची क्षमता वाढण्यासाठी काही महत्त्वपूर्ण तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. संशोधनाला चालना मिळण्यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येणार आहे आणि त्यास रू.२०,००० कोटी इतके वार्षिक अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे देशातील उच्च शिक्षण संस्थांमधील संशोधन केंद्रामध्ये केल्या जाणाऱ्या संशोधनाला निश्चितपणे उत्तेजन मिळू शकेल.

अभ्यासक्रमांच्या बाबतीत लवचिकता आणि प्रवाहीपणा हे या शैक्षणिक धोरणाचे आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे असे प्राधान्याने म्हणता येईल. वेगवेगळ्या शाखांचे आणि विषयांचे मिश्रण करून त्यामधून कोणत्याही आवडीच्या विषयाच्या निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्याला असणार आहे. त्यामुळे सध्या विषयाच्या किंवा अभ्यासक्रमाच्या निवडीच्या बाबतीत असलेली चाकोरीबध्द आणि परंपरागत बंदीस्त व्यवस्था मोडीत निघेल आणि आपल्या आवडीप्रमाणे किंवा आपल्या क्षमतेप्रमाणे विषय निवडीचे किंवा अभ्यासक्रम निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्याला असेल. ही देखील एक चांगली तरतूद या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आलेली आहे. तसेच पदवीचा कालावधी हा चार वर्षांचा असेल अशा प्रकारचीही तरतूद करण्यात आलेली आहे. पण त्या तरतूदीमध्ये कोणताही विद्यार्थी एक किंवा दोन किंवा तीन वर्षानंतर अभ्यासक्रम सोडून गेला तरी एक वर्ष पूर्ण केल्याबद्दल त्याला एका वर्षाचे प्रमाणपत्र, दोन वर्ष पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी सोडून गेला तर त्याला प्रगत पदविका किंवा ॲडव्हान्स डिप्लोमा पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. पदवीचा कालावधी पूर्ण केला तर त्याला पदवी प्रमाणपत्र मिळू शकेल अशा प्रकारची लवचिकता अभ्यासक्रमामध्ये ठेवण्यात आली आहे. भारतीय शिक्षणपद्धतीवर अत्यंत मूलगामी आणि दूरगामी परिणाम करणारा हा बदल आहे असे म्हणायला हरकत नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजेच शिक्षकांचे शिक्षण आणि प्रशिक्षण यासंदर्भात करण्यात आलेली तरतूद होय. यामध्ये सर्वसमावेशक अशा प्रकारचा चार वर्षांचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम पूर्ण करून शिक्षकी पेशामध्ये विद्यार्थ्याला प्रवेश करता येईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे. आणि हा चार वर्षाचा अभ्यासक्रम बहुविध शाखांनी सुसज्ज असेल आणि त्यामध्ये शिक्षक हे भविष्यातील बदलाचे प्रणेते आहेत हे लक्षात घेऊन अत्यंत कार्यक्षम आणि विद्यार्थ्यांप्रती पूर्णपणे बांधिलकी असणारे शिक्षक घडविण्यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षकांच्या अभ्यासक्रमाबरोबरच शिक्षकांच्या नियुक्तीसंदर्भात सुध्दा अत्यंत काटेकोर अशा निवड प्रक्रीयेची शिफारस करण्यात आली आहे. शिक्षक होण्यासाठी चार वर्षाच्या एकीकृत अभ्यासक्रमाबरोबरच शिक्षक पात्रता चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे. यामधील महत्त्वाचा भाग म्हणजे ग्रामीण भागात शिकविण्यासाठी प्रोत्साहीत

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

व्हावे म्हणून शिक्षकांना काही लाभ देण्याचे प्रस्तावित आहे आणि अपात्र शिक्षक किंवा कंत्राटी शिक्षक अशा प्रकारच्या शिक्षकांची नियुक्ती प्रक्रिया पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. थोडक्यात शिक्षकांच्या बी.एड. अभ्यासक्रमापासून शिक्षकांची नियुक्ती तसेच शिक्षकांचे काम व त्यांच्या एकूणच कामासंबंधीचे नियम या सर्वांचा सर्वंकश विचार करून त्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण बदल सुचविण्यात आलेले आहे.

उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी उच्च दर्जाचे ध्येयवादी शिक्षक असायला हवेत. शिक्षक ही नोकरी नसून तो पेशा आहे. शिकवण्याची आवड मुळातून असायला हवी. शिक्षकी पेशाची आवड असणाऱ्या व्यक्तीमधील अंगभूत क्षमता कौशल्ये विकसित व्हावी लागतात. त्यासाठी शिक्षण क्षेत्राचे आणि त्याचबरोबर विद्यार्थी मानसशास्त्राचे परिपूर्ण शिक्षण, प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जागतिक स्पर्धेच्या युगात शिक्षकाची भूमिका केवळ पाठ्यपुस्तक शिकवण्यापुरती मर्यादित राहून चालणार नाही. तो उत्तम समुपदेशक असायला हवा, तो उत्तम मार्गदर्शक असायला हवा, तो उत्तम पालक असायला हवा, अशा विविधांगी क्षमता असणारे शिक्षक तयार व्हावे, यासाठी शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम – जो सध्या दोन वर्षांचा आहे, तो चार वर्षांचा समग्र पदवी अभ्यासक्रम नव्या शैक्षिणक धोरणात प्रस्तावित आहे.

एकूणच सर्वसमावेशकता, समग्र दृष्टीकोन, लवचीकता, शैक्षिणक स्वायत्तता, कौशल्यविकास, ज्ञानकेंद्रित त्याचबरोबर जीवनमूल्ये रुजवणारे शिक्षण हे शिक्षणव्यवस्थेत मोठे अभिसरण करणारे असणार आहे.

या शैक्षणिक धोरणामध्ये सध्या देशामध्ये अस्तित्वात असलेल्या ४०,००० महाविद्यालयांचे रुपांतर १५,००० उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यात येणार आहेत. तसेच शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता मिळणार आहे. शैक्षणिक स्वायत्तता ही शैक्षणिक संस्थांच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, त्याचे कारण असे की एकूणच समाजाच्या गरजा, सभोवतालची परिस्थिती, उद्योग क्षेत्रांची मागणी इत्यादी विविध घटक लक्षात घेऊन त्यानुसार त्या–त्या विभागातील किंवा प्रांतातील शैक्षणिक संस्थांना अभ्यासक्रमांमध्ये बदल करता येणे शक्य होणार आहे. शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता मिळाल्यामुळे जे विविध बदल कालानुरूप करणे अत्यंत आवश्यक होते, की जे बदल पूर्वी शैक्षणिक संस्थांना करणे शक्य नव्हते, ते बदल नवीन शैक्षणिक धोरण लागू झाल्यानंतर वेगाने करता येणे शक्य होणार आहे.

या शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील खर्च ३ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर नेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. १९६६ सालापासून कोठारी कमिशनने सुचविलेली ही तरतूद आजपर्यंत कोणत्याही शासनाला लागू करता आलेली नाही. जगातील सर्व विकसित राष्ट्रांचा अर्थसंकल्प आपण पाहिला तर असे लक्षात येते की, बहुतांशी विकसित देशांमध्ये शिक्षणावरील तरतूद ही ६ टक्क्यांपेक्षा अधिक आहे आणि ही तरतूद अनेक वर्षांपासून ही राष्ट्रे करीत आहेत. शिक्षणावरील खर्च ही एक भविष्यकालीन आणि दीर्घकालीन गुंतवणूक आहे अशा प्रकारचा दृष्टीकोन समोर ठेऊन ही विकसित राष्ट्रे शिक्षणावर अधिकाधिक खर्च करीत असतात. हे जर आपण लक्षात घेतले तर आपल्या देशात शिक्षणावरील खर्चाची तरतूद ही ३ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपेक्षा अधिक करणे हे खूपच आधी व्हायला हवे होते असे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. कारण ५४ वर्षांनंतर वाढलेल्या प्रचंड

लोकसंख्येसाठी शिक्षणावरील ६ टक्के तरतूद सुध्दा आता अपूर्ण आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे ती तरतूद ८ टक्क्यापर्यंत नेण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे तरच या शैक्षणिक धोरणामधील अनेक तरतूदी प्रत्यक्ष लागू करता येतील. अन्यथा शिक्षणावरील खर्चाच्या कमी तरतूदीमुळे अनेक महत्त्वपूर्ण बाबी प्रत्यक्ष लागू करणे कठीण होईल.

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करावी किंवा कशी केली पाहिजे हा आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये आपल्या शैक्षणिक आकृतीबंधा मधील आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेमधील अनेक दोषांचा आणि समस्यांचा आढावा घेऊन ते दोष आणि समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून भविष्यातील समाज घडविण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण तरतूदी या शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आल्या आहेत. परंतु या तरतूदींची अंमलबजावणी जर विहित कालमर्यादेमध्ये प्रभावीपणे झाली नाही तर मात्र आपली सध्याची परंपरागत व्यवस्था तिच्यातील दोषांसह तशीच चालू राहील असे म्हणावेसे वाटते. कारण आपण आतापर्यंत शिक्षण क्षेत्रामध्ये जे अनेक बदल करण्याचा प्रयत्न केला ते सर्व प्रयत्न लक्षात घेतले तर त्यामधील अनेक प्रयत्न हे अयशस्वी ठरल्याचे दिसून येते. उदा. १९८६ सालापासून ऑपरेशन ब्लॅकबोर्डची अंमलबजावणी करण्यात आली परंतू ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये या सुविधा पुरविताना वेळेचा अपव्यय झाल्याचे लक्षात येते. सर्व शिक्षा अभियानाचे काम सुध्दा प्रभावीपणे होऊ शकले नाही. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुध्दा योग्य प्रकारे होऊ शकली नाही. म्हणूनच सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे अंमलबजावणीचा. अंमलबजावणी जर योग्य प्रकारे झाली, आणि वेळेवर अंमलबजावणीचा कालबद्ध आराखडा तयार केला गेला, त्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद केली गेली , सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांची लालफितीमध्ये अडकलेली आणि बंदीस्त असलेली मानसिकता बदलण्यात यश आले तर मला असे वाटते की खरोखरच पुढील पिढी सक्षमपणे घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण तरतूदी असलेल्या या नवीन शैक्षणिक धोरणाला उज्ज्वल भविष्य आहे आणि म्हणूनच देशालाही उज्ज्वल भविष्य आहे.

## संदर्भ:

➢ Dr. K. Kasturinandan, New Education Policy 2020, July 2020.

**Cite This Article:**
***डॉ. किरण सावे,*** *(2022)* स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील शैक्षणिक परिवर्तन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: एक सर्वसमावेशक धोरण, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 62-70.*